# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

## पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### २९ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०१८ सकाळी ८.३० ते ८.३० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | २९ सप्टेंबर २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी | २९ सप्टेंबर २०१७ मधील पाऊस (२४ तासांतील) (मिमी) | २९ सप्टेंबर २०१७ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१७ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | ०.० | १७७९.३ | २२३४ | ७९.६५% | २८.० | २२५३.४ | १००.८७% |
| सांताक्रुझ | ०.० | २२३९.६ | २५१५ | ८९.०५% | २.७ | २९४६.३ | ११७.१५% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | २९ सप्टेंबर २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३७५) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ०.०५ | १७६१.०४ | ७८.८३% | ८१.४६% |
| पूर्व उपनगरे | ०.०१ | २१५५.७७ | ८०.३८% | |
| पश्चिम उपनगरे | ०.०० | १८८७.३० | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २९.८ | २५.५ |
| सांताक्रुझ | ३२.२ | २५.४ |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ३०.०९.२०१८ | मध्यरात्री २:५४ | ४.१४ मी. | ३०.०९.२०१८ | सकाळी ८:३६ | १.६१ मी. |
| ३०.०९.२०१८ | दुपारी २:४५ | ३.८० मी. | ३०.०९.२०१८ | सायंकाळी ८:४६ | ०.८६ मी. |
| ०१.१०.२०१८ | मध्यरात्री ३:४२ | ३.९२ मी. | ०१.१०.२०१८ | सकाळी ९:२९ | १.९१ मी. |

५. हवामान अंदाज : कुलाबा वेधशाळेने पुढिल २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात पावसाच्या काही सरी किंवा गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

६. **पाणी साचणे : निरंक**

७. **घर पडल्याच्या तक्रारी**: शहरात १, पूर्व उपनगरात १ व पश्चिम उपनगरात १ अशा एकुण ३ ठिकाणी घराचा / भिंतीचा काही भाग पडला असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विभागांना व यंत्रणाना कळविण्यात आल्या आहेत. उपरोक्त तक्रारींपैकी पूर्व उपनगरात २९.०९.२०१८ रोजी दुपारी २.१९ वा आनंद नगर सोसायटी, विश्व गौतम नगर, लाल डोंगर, भाजी मंडई, चेंबूर येथे एका खोलीच्या प्लास्टरचा काहीभाग पडून त्यात श्री अभिषेक वाघमारे, वय १७ वर्षे यांना किरकोळ मार लागला.

८. **दरड कोसळणे**: निरंक

९. **शॉर्टसर्किट**: शहरात ४ व पश्चिम उपनगरात २ अशा एकूण ६ ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या. मार नाही.

१०. **झाडे पडण्याच्या तक्रारी**: पश्चिम उपनगरात एकूण २ ठिकाणी झाडे/फांद्या पडण्याच्या तक्रारी नागरीकांकडुन प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना व यंत्रणांना पडताळणीसाठी व पुढिल कार्यवाहीसाठी कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

११. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **पश्चिम रेल्वे** : इतर वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **मध्य रेल्वे** : इतर वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **हार्बर रेल्वे** : सकाळी ११:१० ते सायं ४:१० वाजेपर्यत कुर्ला ते वाशी स्थानकादरम्यान उप तथा डाऊन मार्गावरील वाहतुक बंद राहील, इतर वाहतुक सुरळीत सुरु आहे.
- **बीईएसटी** : वाहतुक सुरळीत सुरु आहे.

१२. **विशेष माहिती**: दिनांक २९.०९.२०१८ रोजी सकाळी ८:१९ वा – एक्सर तलाव, एक्सर रोड, विठ्ठल मंदिराजवळ, बोरीवली (प) येथील तलावात एक मृतदेह तरंगताना आढळला. मृतदेह अग्निशमन दलाच्या जवानांनी गळाच्या सहाय्याने बाहेर काढून स्थानिक पोलीसांच्या ताब्यात दिला. **मृताचे नाव - रामानंद कनोजीया, वय ५५ वर्षे** असे आहे.